


पारशी ५०० 9369 9016129

पांडुरंग भिकू हुंडारे रा चाडा

(२५)

Hundare P.B.

अनुक्रम नंबर छा. ११३६
सन १९२१ चे जुलै
१० तारखेस ३ व ४
चे दरम्यान खेड-पुणे
चे दुय्यम निबंधक कचेरीत
आणून दिला.

Inspector
Rayat Shikshan Sanstha
Western Region Pune-7

दुय्यम निबंधक खेड (पुणे)

खाली लिहिल्या प्रमाणे फी घेतली.

| | रु. | पैसे |
|---|---|---|
| नोंदणी फी | २०० | ०० |
| नक्कल फी | १ | ०० |
| शेरे | १ | ०० |
| फाईलिंग (बंडलिंग) | १ | ०० |
| मेमो | — | — |
| टपाल | | |
| एकूण | २०३ | ०० |

दुय्यम निबंधक खेड (पुणे)

श्री.

...शके १९१८ मिती ... अधिक ... बुधवार तारीख १० माहे ... सन १९९१ ... ते ...----

Scanned with OKEN Scanner

लिहून घेणार :- रयत शिक्षण संस्था सातारा तर्फे, महालिंग महादेव
स्वामी एम.ए. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा,
वय वर्षे ५८ व्यवसाय नोकरी, रा. कार्यालय रयत
शिक्षण संस्था कर्मवीर समाधी परिसर, सातारा तर्फे
शामराव आनंदराव माने, एम.ए.एम.एड. इन्स्पेक्टर
रयत शिक्षण संस्था, पश्चिम विभाग पुणे वय ५४
धंदा नोकरी, रा. औंधगाव पुणे ७

यांसी

लिहून देणार :- १) श्री. पांडुरंग भिकू हुंडारे वय ३८ धंदा शेती,
२) श्री. तुकाराम महादू हुंडारे वय ५८ धंदा शेती,
दोघेही रा.पो. वाडा ता. खेड जि. पुणे

बक्षिसपत्र किंमत रुपये २०,०००/- विस हजाराचे, कारणे बक्षिसपत्र लिहून देतो की, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाउराव पाटील यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रात गेली ७५ वर्षे शिक्षण प्रसाराचे पवित्र व बहुमोल कार्य करीत आहे. या संस्थेने शिक्षण प्रसाराबरोबर सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या कामी फार मोठी कामगिरी बजावली आहे. ग्रामीण जनतेच्या मुलांना अल्प खर्चाने व शक्य तेथे स्वावलंबी तत्वावर शिक्षण देण्याचा प्रयत्न या संस्थेने जो केला आहे. व करीत आहे ती गोष्ट महाराष्ट्राचे दृष्टीने अत्यंत भूषणावह अशी आहे. संस्थेने वरील कार्य करण्याचा मार्ग दाखविल्यामुळे महाराष्ट्रामध्ये अनेक लहान मोठया संस्थांचा उदय होऊन त्याही महाराष्ट्राच्या शिक्षण प्रसाराच्या कामी मदत करीत आहेत. रयत शिक्षण संस्थेतर्फे जे कार्य महाराष्ट्रांत होत आहे, त्याबद्दल आम्हाला नितांत आदर व अभिमान वाटत आहे.

आपले संस्थेकडून आमचे गांवी मौजे वाडा ता. खेड जि. पुणे येथे कर्मवीर विद्यालय वाडा या नांवाचे हायस्कूल सन १९५९ पासून चालविले आहे. या शैक्षणिक शाखेचा उपयोग आमच्या गांवच्या ग्रामस्थांच्या मुलांमुलींना व या परीसरातील दहा-पंधरा गांवच्या ग्रामस्थांच्या मुलांमुलींना झाला आहे, व होत आहे. त्यामुळे या भागातील मुलां मुलींना शहरी न जाता घरी राहून

INDIA NON JUDICIAL

१०० रु. Rs 100

सत्यमेव जयते

भारत

एक सौ रुपये ONE HUNDRED RUPEES

९०१७९८९

मुद्रांक रुपये १०० ... १३६२ विक्री

बाबा दुरंग भिकु डुंडारे रा. वाडा

Hundare P.b.

R. Satkar

--३--

अल्प खर्चात शिक्षण घेण्याची उत्तम सोय झाली आहे. त्यामुळे आम्हांला व या भागातील सर्व जनतेस आनंद व समाधान वाटत आहे. वाडा हे गांव आणि संपूर्ण विद्यालय चास कमान या धरणाचे पाण्याखाली जात आहे. त्यामुळे वाडा गांवातील काही ग्रामस्थ सरकारने देवू केलेल्या भिमा कोरेगांव येथील जागेत पुर्नवसीत होत आहे. पाण्याचा साठा होणार नाही. अश्या आसपासच्या [illegible] वस्त्यावरील ग्रामस्थ वाडा येथेच राहणार आहेत. या ग्रामस्थांच्या मुलां - मुलींचा शिक्षणाची सोय करणेच्या दृष्टीने डुंडारे वस्तीवर विद्यालय सुरु करणेस संस्थेने शासनाकडे परवानगी मागितलेली आहे. त्यानुसार विद्यालय सुरु करणेस परवानगी मिळेल. त्यामुळे आम्ही डुंडारे वस्तीवरील ग्रामस्थांचे मुलां-मुली च्या शिक्षण कार्यासाठी आमचे सर्वांच्या मालकीच्या २आणे ४ पै हिश्यापैकी खालीपुढे वर्णन केलेला हा मिळकत संस्थेस स्वखुषीने व स्वसंतोषाने बक्षीस देत आहोत. तिचे वर्णन पुढील प्रमाणे --

डिस्ट्रीक्ट पुणे सब-डिस्ट्रीक्ट खेड जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती खेड, ग्रामपंचायत वाडा पैकी मौजे वाडा येथील व मा. सब रजिष्ट्रार खेड यांचे हद्दीतील,





Scanned with OKEN Scanner

स.नं. ६० क्षेत्र ८हे७२ आर आकार रु.१८पैसे ० यापैकी दक्षिण बाजूची पुढील तपशिलाप्रमाणे --

| स.नं. | क्षेत्र<br>हे.आर | आकार<br>रु.पैसे. |
|---|---|---|
| ६० | ०=८० | २=१४ |

आमच्या मालकीची ३आणे ४पै.

हिश्यापैकी दक्षिण बाजूने -

चारीसा चतु:सिमा खालील प्रमाणे --

पुर्वेस :- जमीन सर्व्हे नं ६१.ची जमीन.

दक्षिणेस:- जमीन सर्व्हे.नं ५९ ची जमीन.

पश्चिमेस:- रस्ता.

उत्तरेस :- तुमच्या संस्थेस बक्षिसपत्र करुन देवून शिल्लक राहीलेली सर्व्हे नं ६० मधील समाईक जमीन --

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत त्यातील झाडझुडप, तदंगभूत वस्तूसहीत बाजारभावाने रुपयें २०,०००/- विस हजार फक्त किंमतीची अशी बोजाविरहित असलेली या बक्षिसपत्राने कायमची व काहीही अट न घालता रयत शिक्षण संस्थेस काहीही मोबदला न घेता बक्षीस देत आहे.


वाडा हे गांव चासकमान प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेले आहे. परंतु आमच्या मालकीची वरील जमीन ही प्रत्यक्षात बुडीत क्षेत्रात जात नाही. व त्याकरीता मा. जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन(जमीन) पुणे यांचेकडील जिल्हाधिकारी कार्यालय पुणे(पुनर्वसनशाखा) नं जिपुअ/चास/२६१/९१ पुणे-१ दि.२६/३/१९९१ अन्वये त्यांचेकडून पत्रक आणलेले आहे. त्या नुसार हे बक्षिसपत्र करुन दिलेले आहे.

सदर बक्षीस दिलेल्या मिळकतीचा ताबा आजरोजी या बक्षीसपत्राने तुम्हांस दिला आहे. तुम्ही या बक्षीसपत्राने प्राप्त झालेल्या मालकी हक्कानुसार बक्षीस मिळकतीचा मालकी हक्काने वहीवाट करावी व हक्क नोंदणीकडे बक्षीस मिळकतीसंबंधी जरुर त्या नोंदी तुम्ही



Scanned with OKEN Scanner

100Rs




दुकान रुपये १०० ... १३५२ दिनांक १०।६।६९

K. B. Satkar

-५-

करुन द्याव्यात ·नोंद करणेसाठी लागणारे आवश्यक ते जबाब देणेस आम्ही तयार आहोत· मिळकतीचे सरकारी कर ,पट्टया वगैरे देत जावे· सदर मिळकतीचे मालकी वहीवाटीस व उपयोगास आमचे वारस भाऊबंद अगर इतर कोणी ही हरकत केल्यास त्याचे निवारण आम्ही करुन देवू· तुम्हांस कसलीही तोषीस लागू देणार नाही·

सदर बक्षीस दिलेली मिळकत सर्व जातीच्या व धर्माच्या मुलांमुलींना खुली राहील· तुमच्या संस्थेस बक्षीस दिलेली मिळकत यापुर्वी कोणास गहाण,दान, खेरदी ,अगर बक्षीस दिलेली नाही· वा तसा करारही केलेला नाही· रयत शिक्षण संस्था ही सोसायटीज रजिस्ट्रेशन अॅक्ट खाली (सन .१८६० चा २१वा कायदा) रजिस्टर झाली असून तिचा रजिष्टर नं ७६३/१९३५-३६ आहे· तसेच दि·मुम्बै पब्लिक ट्रस्ट अॅक्ट १९५० खालीही नोंदलेली असून तिचा वा अॅक्ट खाली रजिस्टर नं नार्थ सातारा एफ ४ आहे· सरकारी ठराव जीएन·आर· डी·डी ·नंबर एसटी·बी·१२५४ ता·२९ ऑक्टोबर १९५४ प्रमाणे शैक्षणीक संस्थेस स्टॅम्प डयुटी माफ असल्याने

-६-



Scanned with OKEN Scanner

या दस्तऐवजास स्टॅम्प लावलेला नाही. सदर दस्तऐवजाचा अन्य प्रकार ठरलेस संस्था या दस्तास लागणाऱ्या स्टॅम्पच्या रकमेची भरपाई करुन देण्यास तयार आहे. येणे प्रमाणे सदरहूचा दस्त मी माझे राजीखुषीने पुर्ण समजुतीने लिहून दिला आहे. सही दस्तुर आजरोजी टाईप करुन दिले.

श्री. राजेंद्र बाजीराव सालकर रा. राजगुरुनगर

१) Hemdan P.B.

२) तु. म. हुंडारे

(लिहून देणार)

साक्ष

१) नाकुराम गणपत हुंडारे

२) ______

(शिवराम थोंडीबा पाखरे)

या वक्तीसपत्राने दिलेल्या मिळकतीचा मा. सचिव, रयत शिक्षण संस्था सातारा यांनी मला तारीख ४/७/१९९१ रोजी दिलेल्या विशेष मुखत्यार पत्रान्वये कबजा आजरोजी घेऊन. तिचा मी संस्थेच्यावतीने राजीखुषीने स्वीकार केला आहे.

सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

तर्फे.

(१) श्री. सदाशिव रामभाऊ लोंढे
शेती रा० वाडा
(२) श्री. महादेव सिताराम मोरे
शेती रा० वाडा.

लि. देणार

श्री. पांडुरंग भिकू हुंडारे
३८ शेती रा० वाडा
श्री. तुकाराम महादू हुंडारे
५८ शेती रा० वाडा (लि. घेणार)
३) श्री. शामराव आनंदराव माने
५४ नोकरी श्री यगाव
इन्स्पेक्टर रयत शिक्षण संस्था सातारा तर्फे करिता.
दस्तऐवज करुन देणार

ते वरील दस्तऐवज करुन देणारांस स्वतः ओळखत असल्याचे सांगतात व त्यांची ओळख देतात.

१) Randge
सदाशिव रामभाऊ लोंढे
२) [signature]
महादेव सिताराम मोरे

तपाकथीत बक्षिसपत्राचा दस्तऐवज करुन दिल्याचे कबुल करतात.

दिनांक १० माहे जुलै सन १९९१.

दुय्यम निबंधक खेड (पुणे)

१) Hundare P.b.

१) 

जादा पुस्तक क्रमांक- १
च. खंड ३०३ मध्ये २१७
ते २२० पृष्ठांवर ११०९ क्रमांकी
नोंदला-

दुय्यम निबंधक, खेड, (पुणे)
दिनांक १० माहे जुलै सन १९९१

२) तु. म. हुंडारे

२) 

३) [signature]

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OF KHED



Scanned with OKEN Scanner